॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांची महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेची स्थापना करण्यात आली असून या परिषदेमध्ये राज्यातील NIRF क्रमवारीतील पहिल्या ५ किंवा नॅक मानांकन किमान अ श्रेणी मध्ये असणाऱ्या अकृषी विद्यापीठांचे कुलगुरूंची निवड करण्यात येते. यात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु व्ही.एल.माहेश्वरी यांची निवड करण्यात आली आहे. हे पत्राद्वारे महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे कळविण्यात आले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत विचारधारा प्रशाळेमार्फत दि. १० मे रोजी बुध्द पोर्णिमेनिमित्त काव्य अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी प्र.कुलगुरु, प्रा.डॉ.एस.टी.इंगळे तर प्रमुख अतिथी म्हणुन वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल डोंगरे, संगणक प्रशाळेचे संचालक डॉ.राकेश रामटेक, सामाजिकशास्त्रे प्रशाळेचे संचालक डॉ. अजय पाटील, स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक डॉ. अजय सुरवाडे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात भगवान बुध्द यांच्यावर असलेल्या व प्रा.डॉ.म.सु.पगारे लिखित 'बा तथगता' या विशाल काव्याचे मराठी,इंग्रजी, हिन्दी व अहिराणी या चारही भाषेत अभिवाचन करण्यात आले. निवेदन व संचलन प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी केले. प्रा.डॉ. अनिल डोंगरे, श्री.गौरव हरताळे, प्रा.दीपक खरात, भारती सोनवणे, व महेश सुर्यवंशी यांनी काव्याचे मराठीत अभिवाचन केले. इंग्रजीत प्रा.डॉ. सुदर्शन भवरे, प्रा.प्रतिभा गलवाडे यांनी काव्याचे अभिवाचन केले. हिन्दीत प्रा.डॉ. प्रिती सोनी, प्रा. स्नेहा गायकवाड यांनी काव्याचे अभिवाचन केले. तर अहिराणी भाषेत प्रा. कृष्णा संदानशिव, श्री.खेमराज पाटील यांनी विशाल काव्याचे अभिवाचन केले. यावेळी खीरदान करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार बौध्द अध्ययन व संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. संतोष खिराडे यांनी केले. या प्रसंगी प्रा. डॉ.पवित्रा पाटील, डॉ. रोहन कोष्टी, प्रा.डॉ. नितीन बडगुजर, प्रा.डॉ. विजय घोरपडे, श्री. भिमराव तायडे, श्री. भरत पालोदकर, श्री. चंद्रकात वानखेडे, श्री. अनिल बिऱ्हाडे, श्री. किरण पाटील व विविध प्रशाळेतील विद्यार्थी तसेच कर्मचारी वृंद सदर कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते.

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १४ मे, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

कुलसचिव